मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# तुकोबारायांच्या पालखीचे 28 जूनला प्रस्थान

## लोणी काळभोरचा मुक्काम आता नवीन पालखी तळावर : उरुळी कांचनची दुपारची विश्रांती पालखी मार्गावर



**पिंपरी | प्रतिनिधी**

जगद्गुरु संत शिरोमणी तुकाराम महाराजांची पालखी देहू येथून २८ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. १९ दिवसांचा प्रवास करून हा पायी पालखी सोहळा १६ जुलै रोजी पंढरीत दाखल होईल. १७ ते २० जुलै रोजी हा पालखी सोहळा पंढरपूर येथे मुक्कामी राहणार आहे. वारकरी संप्रदायाला ज्या क्षणाची आस लागून असते, त्या आषाढी पालखी प्रस्थानाची घोषणा झाली आहे. यंदा पालखी सोहळ्याचे ३३९ वे वर्ष आहे.

याबाबतची माहिती देहू देवस्थानाचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी दिली. पालखी सोहळा प्रमुख म्हणून विशाल मोरे, माणिक मोरे, संतोष मोरे महाराज यांची निवड करण्यात आली आहे. संत तुकारामांच्या पालखी सोहळ्याची हजारो विठ्ठल भक्त प्रतीक्षा करत असतात. प्रस्थान ठेवल्यानंतर इनामदार वाड्यात पालखी सोहळा पहिला मुक्काम करणार आहे. संत तुकारामांची पालखी १६ जुलै रोजी पंढरीत दाखल होणार असून १७ जुलै रोजी आषाढी एकादशीच्या सोहळ्यात पालखी सोहळ्यातील वारकरी सहभाग घेणार आहेत. आषाढी पालखी सोहळ्याची घोषणा झाल्याने वारकरी संप्रदायात आनंदाचे वातावरण आहे.

पालखी सोहळ्यानिमित्त संत तुकाराम महाराज संस्थानाची जय्यत तयारी सुरू आहे. देहू ते पंढरपुर या पालखी मार्गावर वारीतील वारकऱ्यांना विविध सुविधा देण्यासाठी एक महिना अगोदर पालखी मार्गाची पाहणी केली जाणार असल्याचे पालखी सोहळा प्रमुख विशाल महाराज मोरे यांनी सांगितले.

### पालखी सोहळ्याचा कार्यक्रम

» २८ जूनला दुपारी दोन वाजता पालखी प्रस्थान होणार असून पालखीचा पहिला मुक्काम इनामदार वाड्यात. २९ जूनला पालखी सोहळा आकुर्डीत मुक्कामी असणार आहे. ३० जूनला पालखी पुण्यात दाखल होणार असून दोन दिवस नाना पेठेतील श्री निवडुंगा विठ्ठल मंदिरात मुक्कामी असणार आहे. २ जुलैला पालखी सोहळा लोणी काळभोरला, ३ जुलैला, ४ जुलैला वरवंड, ५ जुलैला उडंवडी गवळ्याची, ६ जुलैला बारामती शारदा विद्यालय, ७ जुलैला सणसर पालखी तळ, ८ जुलैला पालखी आंथुर्णेत मुक्कामी असून बेलवाडीत दुपारी पहिले गोल रिंगण होणार आहे.

९ जुलैला निमगाव केतकी, १० जुलैला इंदापूर पालखी तळावर मुक्काम असून दुपारी गोलरिंगण होणार आहे. ११ जुलैला सराटी पालखी तळ, १२ जुलैला अकलूज माने विद्यालय पालखी तळावर मुक्कामी असून दुपारी गोल रिंगण होणार आहे. १३ जुलैला बोरगाव येथे मुक्कामी असून दुपारी माळीनगर उभे रिंगण होणार आहे. १४ जुलैला पिराची कुरोली, १५ जुलैला वाखारीला उभे रिंगण होणार आहे. १६ जुलैला श्री क्षेत्र पंढरपूर संत तुकाराम महाराज नवीन इमारत येथे पालखी सोहळा दाखल होणार असून याठिकाणी उभे रिंगण होणार आहे. १७ जुलै रोजी आषाढी एकादशीच्या सोहळ्यात पालखी सोहळ्यातील वारकरी सहभाग घेणार आहेत. चार दिवसांच्या पंढरीतील मुक्कामानंतर २१ जुलैला पालखी सोहळ्याचा परतीचा प्रवास सुरू होणार आहे.

---

# मावळमध्ये 'या' वाघेरेंचा अर्ज बाद!

## संजय सुभाष वाघेरे यांचा उमेदवारी अर्ज बाद : संजोग रवींद्र पाटील यांचा अर्ज वैध



**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांच्याशी नामसाधर्म्य असलेले अपक्ष उमेदवार त्यांच्या विरोधकांनी उभे केले होते. पण, त्यापैकी नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील बंधारपाडा येथील संजय सुभाष वाघेरे यांचा उमेदवारी अर्ज बाद झाला आहे. तर, उरणमधील संजोग रवींद्र पाटील यांचा अर्ज वैध ठरला आहे. त्यामुळे संजोग वाघेरे यांची थोडी डोकेदुखी कमी झाली आहे. एक वाघेरे बाद झाला पण संजोग पाटील यांचा अर्ज वैध ठरला.

मावळ लोकसभा मतदारसंघासाठी १८ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली. पहिल्या दिवशी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नव्हता. दुसऱ्या दिवशी एकाने तर पाचव्या दिवशी तीन अर्ज दाखल झाले. त्यात शिवसेना महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांचा समावेश होता. २३ एप्रिल रोजी महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांच्यासह सहा तर २४ एप्रिल रोजी वंचित बहुजन आघाडीच्या माधवी जोशी यांच्यासह आठ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. तर, २५ एप्रिल, शेवटच्या दिवशी २० जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

एकूण ३८ अर्ज दाखल झाले आहेत. या अर्जांची शुक्रवारी (२६ एप्रिल) छाननी केली. त्यापैकी संजय वाघेरे यांची मतदार यादीची सांक्षाकीत प्रत नसल्याने अर्ज बाद झाला. त्यांना नोटीस दिली होती. पण, त्यांनी त्यांचे उत्तर दिले नाही. तर, काँग्रेसचा ए, बी फॉर्म नसल्याने गोपाळ तंतरपाळे यांचा तर राष्ट्रीय वाल्मिकी सेना पार्टीचे राजेंद्र मानसिंह छाजछिडक यांचाही अर्ज बाद झाला आहे. तिघांचे अर्ज बाद झाले असून ३५ जणांचे वैध ठरले आहेत.

# मोहोळ यांच्या पदयात्रेत गुंडांचा समावेश

## महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांचा मुरलीधर महोळ यांच्यावर आरोप

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी कोथरूड येथील छत्रपती शिवाजी महाराज ते डेक्कन येथील संभाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेत भाजपाचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, आमदार भीमराव तापकीर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही पदयात्रा शहराच्या मुख्य रस्त्यावरून आयोजित केल्याने नागरिकांना प्रचंड वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागले. तर दुसऱ्या बाजूला काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीदेखील पदयात्रेत सहभागी झाले होते, अशी माहिती समोर येत आहे. त्यावरून महाविकास आघाडीतील नेते अधिक आक्रमक झाल्याचे पाहण्यास मिळत आहे.

भाजपाचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या पदयात्रेबाबत महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांना विचारले असता ते म्हणाले की, एक वर्षभरापूर्वी कसबा पोटनिवडणूक झाली, त्यावेळी राज्यातील महायुती सरकारने माझ्या पराभवासाठी सर्व पद्धतीने ताकद लावली होती. अनेक भागांत गुंडदेखील उतरविले होते. पण, कसबा मतदारसंघातील नागरिक माझ्या पाठिशी राहिले आणि मला विजयीदेखील केले. मी आता लोकसभा निवडणुकीला सामोरे जात आहे. या निवडणुकीमध्येदेखील मला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण, माझ्या पाठिशी पुणेकर नागरिक राहतील आणि याही निवडणुकीत मला विजयी करतील, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

तसेच ते पुढे म्हणाले की, काल कोथरूड ते डेक्कनदरम्यान भाजपाचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांची पदयात्रा झाली.



### भाजपाचाच देशभरातील महिलांच्या मंगळसूत्रावर डोळा

**» काँग्रेस पक्ष सत्तेत आला तर तुमचं मंगळसूत्र आणि सोनं चांदी हिसकावून घेईल, असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थानातील एका जाहीर सभेत बोलताना केला होता. त्या विधानावरून काँग्रेस पक्षाचे नेते मोठ्या प्रमाणावर आक्रमक झाले असून त्याबाबतीत पुणे लोकसभेचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार रविंद्र धंगेकर म्हणाले की, देशात महागाई आणि बेरोजगारीने नवा उच्चांक गाठला आहे. जनतेला घरातील दागिने विकून घर चालवावे लागत आहे. गरीब लोक रस्त्यावर आले आहेत. अशा घटनेतून मंगळसूत्रावर खरा डोळा भाजपाचाच आहे हे सिद्ध होतं, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विधानावर त्यांनी टीका केली.**

या पदयात्रेदरम्यान भाजपाचे अनेक नेतेमंडळी आणि नागरिकदेखील उपस्थित होते. पण, या पदयात्रेमुळे शहरातील सर्वसामान्य नागरिकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागले आहे. कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून सर्वसामान्य नागरिकांना त्रास होता कामा नये, ही काळजी घेतली पाहिजे. मात्र, भाजपाच्या उमेदवारीने ती काळजी घेतली नाही. या त्रासाचे उत्तर पुणेकर नागरिक मतदानाच्या माध्यमातून निश्चितच देतील, तसेच या पदयात्रेकरिता पैसे देऊन बाहेरून नागरिक आणले गेले. त्याही पुढे जाऊन या पदयात्रेत गुंडांचादेखील समावेश होता, अशी माहिती समोर येत आहे. अशा शब्दात भाजपा नेत्यांना त्यांनी सुनावले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पुण्यात सभा होत आहे. त्या प्रश्नावर ते म्हणाले की, मागील दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक केली आहे, त्यामुळे अनेक राज्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातून गेली आहेत. यातून नरेंद्र मोदी यांच्या विरोधात लाट असल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी नरेंद्र मोदी यांच्या सभा होतील, तेथील भाजपाचा उमेदवार पडणार आहे. त्यामुळे यंदाची ही निवडणूक भावनेची न होता, भाकरीची झाली पाहिजे, अशी भूमिका मांडत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांनी टोला लगावला.

# शिवाजीराव आढळराव यांच्या मालमत्तेत 6 कोटींनी वाढ!

## आढळराव कुटुंबीयांकडे एकूण 39 कोटी 68 लाख 190 रुपयांची जंगम आणि स्थावर मालमत्ता

**पुणे | प्रतिनिधी**

महायुतीचे शिरूर लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार शिवाजीराव आढळराव आणि त्यांच्या कुटुंबीयांकडे एकूण ३९ कोटी ६८ लाख १९० रुपयांची जंगम आणि स्थावर मालमत्ता आहे. गेल्या पाच वर्षांत त्यांच्या मालमत्तेत सहा कोटी रुपयांनी वाढ झाली आहे.

आढळराव यांनी आपला उमेदवारी अर्ज गुरुवारी दाखल केला. तेव्हा सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात ही माहिती नमूद करण्यात आली आहे. आढळराव आणि त्यांच्या कुटुंबीयांची १२ कोटी ५१ हजार ६० रुपये जंगम मालमत्ता आहे, तर २७ कोटी ६७ लाख ४९ हजार १३० रुपयांची स्थावर मालमत्ता आहे. त्यांच्यावर एक कोटी ५१ लाख १९ हजार ७२९, तर पत्नीवर एक कोटी ८० लाख ७६ हजार ९०४ रुपयांचे कर्ज आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठातून कला शाखेच्या प्री-डिग्रीपर्यंत शिक्षण घेतले आहे. त्यांनी व्यवसाय, शेती आणि सामाजिक कार्य करत असल्याचे नमूद केले आहे. त्यांच्याकडे सहा लाख ४० हजार ६९३ रुपये, तर पत्नीकडे तीन लाख ५२ हजार १२० रुपये रोख रक्कम आहे. त्यांच्याकडे विविध बँकांच्या बचत खात्यांत एक कोटी तीन लाख ६९ हजार



६१६ रुपये आहेत. रोखे, कर्जरोखे आणि समभाग यामध्ये सहा लाख ६८ हजार ४३५ रुपयांची गुंतवणूक आहे.

विविध वित्तीय साधने, राष्ट्रीय बचत योजना, टपाल आणि जीवन विमा यात दोन कोटी सहा लाख ७८ हजार ११७ रुपयांची गुंतवणूक आहे. आढळराव यांनी तीन कोटी ८५ लाख ८९ हजार ५४३ रुपये विविध व्यक्ती आणि संस्थांना कर्ज आणि आगाऊ रक्कम स्वरूपात दिले आहेत. त्यांच्याकडे बोलेरो चारचाकी आहे. आढळराव यांच्या नावे चिंचोली आणि लांडेवाडी येथे ३१ लाख ९८ हजार ८३३ रुपयांची शेतजमीन आहे. घाटकोपर, विक्रोळी, पुण्यातील शिवाजीनगर येथे वाणिज्यिक इमारती आहेत. मुंबईतील पवई, पुण्यातील एरंडवणा, लांडेवाडी, मंचर, चिंचोडी येथे सदनिका आहेत.

दरम्यान, पत्नीच्या नावे विविध बँका, पतसंस्थांमधील बचत खात्यांत चार लाख ७९ हजार ४८६ रुपये आहेत. पत्नीने रोखे, कर्जरोखे आणि समभाग यामध्ये ४१ लाख २८ हजार ४५१ रुपयांची गुंतवणूक आहे. पत्नीच्या नावे ३० लाख ४३ हजार ९८८ रुपयांचा जीवन विमा आहे. पत्नीने व्यक्ती आणि संस्थांना कर्ज आणि आगाऊ रक्कम स्वरूपात एक कोटी १७ लाख ४६ हजार रुपये दिले आहेत. पत्नीकडे १५१ तोळे सोने, तीन किलो चांदी, हिऱ्यांचे दागिने असून त्यांची एकूण किंमत एक कोटी नऊ लाख ११ हजार ५०५ रुपये आहे. पत्नीच्या नावे चालू खात्यांत दोन लाख ९० हजार ३४० रुपये आहेत. पत्नीकडे लांडेवाडी, चाकण, चिंचोली येथे एक कोटी ७७ लाख २९ हजार १५० रुपयांची शेतजमीन आहे. लांडेवाडी येथे बिनशेती जमीन, तर मुंबईतील विक्रोळी येथे वाणिज्य इमारत आहे.

# पीएमपीने प्रवाशांचे पैसे केले परत

## कॅशलेस सेवा होईना सुरळीत : 21 लाखांहून अधिक व्यवहार नोंदविले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पीएमपीने तिकीट विक्रीसाठी अमलात आणलेली कॅशलेस सेवा अद्याप सुरळीत झाली नसल्याचे दिसून येत आहे. अनेकदा प्रवाशांचे पैसे कट होऊनही तिकीट मिळत नव्हते. अशा प्रवाशांना आपले पैसे परत मिळविण्यासाठी अतिशय किचकट प्रक्रिया पूर्ण करावी लागते. ही क्लिष्ट प्रक्रिया सहा हजारांहून अधिक प्रवाशांनी पूर्ण केली. त्यापैकी चार हजार प्रवाशांचे सुमारे दीड लाख रुपये पीएमपीने परत केले आहेत.



पीएमपीने सुट्ट्या पैशांची कटकट मिटावी म्हणून सुरू केलेल्या ऑनलाइन तिकीटांच्या पर्याय प्रवाशांना उपलब्ध करून दिला. मार्च अखेर २१ लाखांहून अधिक व्यवहार नोंदविले गेले आहेत. मात्र, रेंज नसणे आणि इतर कारणांनी पैस वजा होऊनही तिकीट मिळत नव्हते. त्यामुळे प्रवाशांना रोख रक्कम भरावी लागत होती.

अशा तिकीटाचे पैसे वजा झालेल्या ४ हजार २०४ जणांचे सुमारे दीड लाख रुपये पीएमपीच्या विकीट विभागाकडून परत करण्यात आले आहेत. पिंपरी चिंचवड, पुणे आणि पीएमआरडीएच्या क्षेत्रात पीएमपी आपली सेवा देते. तर, सुमारे ११ लाख प्रवासी पीएमपीच्या बसने रोज या क्षेत्रात प्रवास करतात.

नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा सुट्ट्या पैशांवरून रोजच वाद होत होते. ते टाळण्यासाठी ऑक्टोबर २०२३ पासून ऑनलाइन माध्यमातून पीएमपी प्रशासनाने प्रवाशांसाठी युपीआय तिकीट पद्धती सुरू केली. तर, येत्या १ मे पासून पीएमपी गो अॅप कार्यरत होणार असून या माध्यमातून आता प्रवाशांना घरबसल्या ऑनलाइनच्या माध्यमातून तिकीट काढता येणार आहे.

युपीआय तिकीट पद्धतीमध्ये विविध कारणांनी तिकीट निघत नसल्याने प्रवाशांना पैसे कट होऊनही रोख रक्कम देऊन पुन्हा तिकीट काढावे लागत होते. त्यामुळे अनेकदा वाहक व प्रवासी यांच्यामध्ये वादाचे प्रसंग उद्भवत होते. ऑक्टोबर २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत यूपीआय पेमेंटद्वारे पैसे भरूनही तिकीट न मिळाल्याने आतापर्यंत सुमारे ६ हजार ११८ जणांनी तक्रार अर्ज दाखल केलेले आहेत. तर, २ लाख ४० हजार रुपये इतकी रक्कम आहे. त्यातील सुमारे ४ हजार २०४ जणांचे पैसे पीएमपीच्या तिकीट विभागाकडून परत करण्यात आले आहेत. सर्व पैसे हे अर्ज मागवून बँकेमार्फत परत करण्यात आलेले आहेत.

पीएमपीच्या ऑनलाईन तिकीट विक्री मशीन्सचा बट्ट्याबोळ झाल्याचे दिसून येत असून यावर पीएमपी प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. सातत्याने मशिन्समध्ये बिघाड होणे, ग्रामीण मार्गांवर इंटरनेट सुविधिचे अडचण असल्याने युपीआय पेमेंट न होणे, तिकीट व्यवस्थित प्रिंट न होणे, कोरी तिकीटे निघणे अशा प्रकारच्या तिकीट विक्री प्रक्रियेत अडचणी येत असून याचा फटका वाहकांना बसत आहे. स्कॅन कोड प्रक्रियाही संथ असून सामान वाहतुकीचे तिकीट मशीनमध्ये बुक होत नाही. काही ठिकाणी एका तिकिटाच्या मागणीवर अनेक तिकिटे निघतात. त्यामुळे प्रवाशी पैसे देत नाही. परंतु, मशीनमध्ये पैसे मात्र काउंट होतात. त्याचा भुर्दंड वाहकाला बसत असल्याचे एका वाहकांकडून सांगण्यात आले. यावर कार्यवाही होताना दिसून येत नाही याचा फटका प्रवाशांना बसत असल्याचे दिसून येते.

### ऑनलाइन तिकीट काढणाऱ्यांची संख्या अत्यल्प

» आजच्या डिजिटल युगात बहुतेक पेमेंट ऑनलाइन केले जातात. परंतु पीएमपीच्या बाबतीत परिस्थिती उलट आहे. पीएमपी बसने रोज सरासरी ११ लाख प्रवासी प्रवास करतात. याचा अर्थ की ऑक्टोबर २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत पीएमपीने सुमारे १८ कोटी तिकीटे दिली. त्यापैकी केवळ २१ लाख ऑनलाइन आहेत. त्यातही प्रचंड तक्रारी आहेत. जर संपूर्ण तिकीट व्यवस्था कॅशलेस केल्यास किती अडचणी आणि तकारी येतील? तिकीटासाठी ऑनलाइन ट्रान्सफर केलेले २० ते ३० रुपये परत मिळविण्यासाठी पीएमपीने क्लिष्ट प्रक्रिया ठेवली आहे, यामुळे अनेक जण तक्रारीच करत नाहीत. लोकांनी तक्रारीच करु नये, यासाठी अशी प्रक्रिया ठेवल्याचा आरोप प्रवासी करत आहेत.

---

# लोकशाही टिकवण्यासाठी हुकूमशाही सरकारला घरी बसवा

## खोपोलीत संजोग वाघेरेंच्या प्रचारार्थ अल्पसंख्याक समाजाचा मेळावा संपन्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

देशात लोकशाही टिकवायची असेल, तर हुकूमशाही सरकारला घरी बसवले पाहिजे. महाराष्ट्राचे हित साधण्याचे, समाजातील सर्व घटकांना खऱ्या अर्थाने न्याय देण्याचे काम फक्त महाविकास आघाडीच करू शकते. त्यामुळे मावळ लोकसभा मतदार संघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना लोकसभेत पाठवू, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाचे राष्ट्रीय अल्पसंख्याक अध्यक्ष सिराज मेहंदी यांनी व्यक्त केले.



खोपोली येथे मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस व प्रवक्ते नासिम सिद्दिकी, शिवसेना पक्षाचे तालुका प्रमुख एकनाथ पिंगळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी गटाचे मोहम्मद नजीर, सुलतान मालदार, रियाज पठाण, असलम खान, राशिद भाई, यांच्यासह मुस्लिम अल्पसंख्यांक समाजातील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बदल घडविण्याची हीच वेळ

» मावळ लोकसभेचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, आज देश कोणत्या पातळीवर जायला पाहिजे होता. आता कुठे आहे. आज पर्यंत मोदी सरकारने आश्वासने दिली. काळे धन आणू , सर्वसामान्य नागरिकांच्या खात्यात पंधरा लाख जमा करू, दोन लाख तरुणांना नोकऱ्या देवू , काळा पैसा आणू असे काहीही केले नाही. आज पर्यंत खोटी आश्वासने दिली. “ना खाऊंगा, ना खाने दुंगा” असा या सरकारचा जुमला आहे. आपल्या भारताचा नागरिक प्रेमळ आणि भावनिक आहे. त्यामुळे त्याचा फायदा घेवून ते पुढे गेले. परंतु, महागाई, बेरोजगारी यावर एक शब्द ते आज बोलत नाही. त्यामुळे बदल घडविण्याची हीच वेळ आहे. येणाऱ्या 13 तारखेला मशाल चिन्हावर शिक्कमोर्तब करून या बदलाचे साथीदार व्हा, असे आवाहन त्यांनी केले.

# मेट्रो सुसाट! उत्पन्नातही मोठी वाढ

## मेट्रोच्या रुबी हॉल ते रामवाडी विस्तारित मार्गामुळे प्रवासी संख्येत 20 हजारांची वाढ



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे मेट्रोच्या रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या विस्तारित मार्गामुळे मेट्रोच्या प्रवासी संख्येत २० हजारांची वाढ झाली आहे.

पुणे मेट्रोच्या रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या विस्तारित मार्गामुळे मेट्रोच्या प्रवासी संख्येत २० हजारांची वाढ झाली आहे. यामुळे मेट्रोची एकूण दैनंदिन प्रवासी संख्या सरासरी ८० हजारांवर पोहोचली आहे. या मार्गावरील येरवडा स्थानक अद्याप सुरू झाले नसून ते सुरू झाल्यानंतर प्रवासी संख्येत आणखी वाढ होणार आहे.

रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मेट्रो मार्गाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे ६ मार्चला केले. मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या आधी सुमारे ६० हजार होती. रामवाडीपर्यंत विस्तारित मार्ग सुरू झाल्यानंतर दैनंदिन प्रवासी संख्या ८० हजारांवर पोहोचली आहे. विस्तारित मार्ग सुरू होण्याआधी मेट्रोचे दैनंदिन उत्पन्न सुमारे १० लाख रुपये होते. आता मेट्रोचे दैनंदिन उत्पन्न १२ लाख ५० हजार रुपयांवर पोहोचले आहे.

मेट्रोला प्रवाशांचा प्रतिसाद
सरासरी दैनंदिन प्रवासी – ८० हजार
सरासरी दैनंदिन उत्पन्न – १२ लाख ५० हजार रुपये

6 आणि 7 मार्च रोजी प्रवाशांनी त्यांना चांगला प्रतिसाद दिल्याचे पुणे मेट्रोच्या अधिकाऱ्याने सांगितले. या दोन दिवसांत 52 हजार 763 प्रवाशांची नोंदणी झाली. त्यातून 4 लाख 33 हजार रुपयांचा महसूल मिळाला. ही मार्गिका रामवाडीला पीसीएमसी क्षेत्राशी आणि कोथरूड ते रामवाडीला जोडतो. येत्या आठवड्यात प्रवासी संख्येत वाढ होईल, असा अंदाज मेट्रोच्या व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

मेट्रोच्या एका प्रवाशाने दिलेल्या माहितीनुसार, तो शनिवार पेठेजवळील एका कार्यालयात काम करतो. तो बसने प्रवास करत होता आता मात्र मेट्रोने त्याचा प्रवास सोपा झाला आहे. वनाझ ते रामवाडी या 15 किमी मार्गावर 15 स्थानके आहेत. रुबी हॉल क्लिनिक ते रामवाडी मार्गावर बंड गार्डन, येरवडा, कल्याणी नगर आणि रामवाडी ही स्थानके आहेत. पीसीएमसी ते फुगेवाडी हा सात किलोमीटरचा आणि वनाझ ते गरवारे कॉलेज या पाच किलोमीटरच्या भागाचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते 6 मार्च 2022 रोजी करण्यात आले होते. त्यानंतर 1 ऑगस्ट 2023 रोजी गरवारे कॉलेज ते रुबी हॉल क्लिनिक ( 4.75किमी) आणि फुगेवाडी ते सिव्हिल कोर्ट (6.91 किमी) या पुणे मेट्रो मार्गाचं त्यांनी उद्घाटन केले.

### तिकीट खिडकीवर सुटे पैसे मिळेनात

» मेट्रोच्या तिकीट खिडकीवर तिकीट काढल्यानंतर सुटे पैसे परत दिले जात नसल्याचा अनुभव काही प्रवाशांनी मांडला आहे. प्रगती सांगळे नावाच्या तरुणीने १८ रुपयांचे तिकीट काढण्यासाठी ५० रुपये दिले होते. तिला ३० रुपये परत देण्यात आले. तिने २ रुपयांची मागणी केली. मात्र सुटे पैसे नसल्याचे कारण देण्यात आले. याबाबतचा व्हिडीओ तिने समाजमाध्यमावर टाकला आहे. त्यावर अनेक प्रवाशांनी असाच अनुभव आल्याचे म्हटले आहे.

तिकीट दर किती ? वनाज ते रामवाडी- 30 रुपयेरुबी हॉल ते रामवाडी- 20 रुपये रुबी हॉल ते रामवाडी मार्गिकेवर तीन स्टेशन्स पडणार आहेत. बंड गार्डन, येरवडा आणि कल्याणी नगर या तिन्ही स्टेशनची नावं आहेत.

यामध्ये वनाज ते सिव्हिल कोर्ट हा 8 किमीचा मार्ग आहे. या मार्गावरचा 22 मिनिटांचा प्रवास असेल. तर पिंपरी ते सिव्हील कोर्ट हा 25 किमी चा प्रवास आहे. मात्र, या मेट्रोचा प्रवास आणि मार्ग कोणते असतील? मेट्रोचे तिकीट आणि वेळ काय असणार आहे? याबाबत सविस्तर माहिती खाली देण्यात आली आहे.

मेट्रोचा वेळ सकाळी 7 ते रात्री 10 पर्यंत दोन्ही मार्गांवर मेट्रो सेवा सुरू राहणार आहेत.गर्दीच्या वेळेत दर 10 मिनिटांनी प्रवाशांना मेट्रो उपलब्ध असणार आहेत.12 ते 4 या वेळेत दर 15 मिनिटांनी मेट्रो उपलब्ध असणार आहेत.

# विसरभोळ्या प्रवाशांमध्ये पुणेकर देशात पाचव्या स्थानी!

## प्रवाशांच्या विसरलेल्या वस्तूंमध्ये मोबाइल फोनचे आणि लॅपटॉप बॅगचे प्रमाण सर्वांत जास्त



**पुणे | प्रतिनिधी**

प्रवासादरम्यान प्रवासी अनेक वेळा वस्तू विसरतात. देशाची राजधानी दिल्लीतील प्रवासी सर्वाधिक विसरभोळे असल्याचे समोर आले आहे. आर्थिक राजधानी असलेली मुंबई दुसऱ्या स्थानी असून, पुणे पाचव्या स्थानी आहे. प्रवाशांच्या विसरलेल्या वस्तूंमध्ये मोबाइल फोनचे आणि लॅपटॉप बॅगचे प्रमाण सर्वांत जास्त आहे.

ऑनलाइन प्रवासी वाहतूक क्षेत्रातील उबरने 'लॉस्ट अँड फाऊंड निर्देशांक २०२४' जाहीर केला आहे. या निर्देशांकात दिल्लीने प्रथम स्थान पटकावले आहे. त्यानंतर मुंबईने दुसरे स्थान कायम राखले आहे. बंगळुरूने हैदराबादला मागे टाकून तिसरे स्थान मिळवले आहे. या निर्देशांकात पुणे पाचव्या स्थानी आहे. गेल्या वर्षभरात विसरलेल्या प्रमुख वस्तूंमध्ये मोबाइल फोन, लॅपटॉप बॅग, कपडे यांचा समावेश आहे. तसेच चावी, पाण्याची बाटली यांसह चष्मा आणि दागिनेही प्रवासी विसरल्याचे समोर आले आहे. काही वेळा प्रवाशांनी युकूलेली वाद्य, नाण्यांचा संग्रह, प्रसाद, ट्रीमर आणि पारपत्रासारखी महत्त्वाची कागदपत्रे विसरल्याचेही प्रकार घडले आहेत.

सर्वसाधारपणे प्रवाशांनी उबरमध्ये वस्तू विसरण्याचे प्रमाण शनिवारी जास्त आहे. विसरलेल्या वस्तूंमध्ये निळ्या रंगाच्या वस्तूंचे प्रमाण अधिक असून, त्याखालोखाल लाल आणि गुलाबी रंगाच्या वस्तूंचा समावेश आहे. प्रवासी संध्याकाळी सातच्या सुमारास वस्तू विसरण्याचे प्रमाण जास्त आहे. गेल्या वर्षभरात दिवाळीच्या काळात प्रवाशांनी वस्तू हरवण्याचे प्रमाण जास्त होते, असे उबरने म्हटले आहे.

उबरची सेवा वापरताना प्रवासी वाहनात एखादी वस्तू विसरल्यास त्याला उबरच्या उपयोजनामध्ये 'लॉस्ट अँड फाऊंड'चा पर्याय असतो. या पर्यायाचा वापर करून तो विसरलेल्या वस्तूबाबत माहिती देऊ शकतो. त्यानंतर उबरकडून संबंधित चालकाशी संपर्क साधून ती वस्तू परत मिळवून दिली जाते. लॉस्ट अँड फाऊंड पर्यायाचा वापर करणाऱ्या ग्राहकांच्या माहितीच्या आधारे उबरने हा निर्देशांक बनवला आहे.

### या वस्तु प्रामुख्याने विसरल्या

»विसरभोळ्या प्रवाशांनी काही खास वस्तु स्थानकावर विसरून सोडल्या आहेत. यात प्रामुख्याने मोबाइल फोन, लॅपटॉप बॅग, आणि कपड्यांचा समावेश आहे. या सोबतच , हेडफोन, पाकीट, चावी, पाण्याची बाटली, चष्मा अथवा गॉगल आणि दागिनेही प्रवासी विसरल्याचे अहवालात पुढे आले आहे. काही प्रवाशांनी तर विसारण्याची हद्द केली आहे. त्यांची आवडीचे वाद्य, नाण्यांचा संग्रह, प्रसाद, ट्रीमर तर पासपोर्ट सारखी महत्त्वाची कागदपत्रे देखील विसारण्याचे प्रकार घडले आहेत.